# मराठीतील लघुनिबंध

-

प्रा.डॉ.बापू जी घोलप
मु.पो. लिंबागणेश ता. जि. बीड ४३११२६
मो. ७५८८०५७६९५

मराठीतील लघुनिबंध हा साहित्य प्रकार इंग्रजीतील एसे या साहित्य प्रकारावरुन आला आहे. फ्रेंचमधील लेखक मॉतेन हा एसे चा जनक मानला जातो. इंग्रजीतील एसेवर मँातेनचा प्रभाव आहे. मँातेनच्या लेखनात अल्पाक्षरता व विषय वैविध्य हे विशेष आढळतात. स्वत:ला दिसलेल्या भावलेल्या  जगाचे चित्रण तो आत्मपर वृत्तीने करतो. मँातेनच्या पद्धतीनेच लघुनिबंध लेखन करणारा फ्रान्सिस बेक हा अठराव्या शतकातील लोकप्रिय निबंधकार  होता. हा इंग्रजी निबंधही दोन प्रकारचा आहे. एका प्रकारात वैचारिकतेला, औपचारिक मांडणीला प्राधान्य आहे.

आद्य लघुनिबंधकार म्हणून ना. सी. फडके यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांचा सुहास्य हा लेख रत्नाकर मासिकात (१९२५) प्रकाशित झाला. ते पाहिले ललितगद्य आहे. फडक्यांनी लघुनिबंधाच्या स्वरुप विशेषांविषयीही लेख लिहिले आहेत. त्यांचे चोखंदळ ललित गद्याचे अनेक संग्रह प्रकाशित झालेले दिसतात.

फडक्यांच्या बरोबरीने, समकालीन लेखक म्हणून खांडेकरांचे नाव घेतले जाते. तसेच ललित गद्यामध्येही  वि. स . खांडेकरांचे मोलाचे योगदान आहे. किंबहुना आनंद यादवांनी  तर  खांडेकरांनाच आद्य ललित निबंधाचे जनकत्व दिलेले आहे. खांडेकरांनी अक्षरश: शेकडो लघुनिबंध लिहून मायमराठीची  सेवा केली  आहे. त्यांचा लघुनिबंध, त्यांची सुभाषितात्म भाषाशैली, चिंतनशीलतेची अभिजातता यामुळे लक्षवेधी ठरणारा आहे. किंबहुना समग्र खांडेकरी वाङ्मय हे आदर्शाची पाठराखण करणारे आहे. त्याचे अंश खांडेकरी लघुनिबंधातही अवतरलेले दिसतात.

लघुनिबंध हा एक दुय्यम लवचिक साहित्य प्रकार आहे. वाचकांशी आत्मियतेने व  प्रांजळपणे सहवास साधणे हे लघुनिबंधाच्या लेखनामधील प्रमुख उदिष्ट असते. हे खरे असले तरी लघुनिबंधकार आपल्या लेखनातून जे जग उभे करत असतो, त्याचा तो आपल्या दृष्टिकोणातून अंतर्मुख वृत्तीने अर्थही लावतो. त्यामुळेच त्याच्या लघुनिबंधाचे मूल्य वाढते. केवळ बहिर्मुख वृत्तीने चांगल्या वृत्तीचा लघुनिबंध लिहिता येणे शक्य नाही. लघुनिबंधात कल्पनाविलासही  आवश्यक असतो. तोही वाचकाला आवाहक वाटतो.

ललित लेखन हे आत्मनिष्ठ असते, असावे हे खरे पण आत्म विषयी खरेखुरे वास्तव लिहिणे जड जाते म्हणून मी हया काल्पनिकाचा आधार घेतला जातो. म्हणजे आत्मनिष्ठा, अनुभव आत्मपर लेखन हेही मी च्या आडून करण्याचा ललित लेखनात एक प्रघात असल्याचे दिसते. प्रत्यक्षातील तपशील लेखनात बदलावेत, प्रत्यक्षापासून लांब न्यावेत आणि स्वत:ला स्वत:विषयी काय लिहायचे ते काल्पनिक मी च्या आडून लिहावे असा एक पायंडा मराठी ललित गद्यात पडलेला दिसून येईल. मराठी लघूनिबंधाच्या परंपरेतील निवेदक मी हा याचा पुरावा आहे. तो काहीसा खरा पण बराच खोटा आहे. तरीही सरसकट गद्य ललित लेखनातला मी म्हणजे खुद लेखकच असे वाचक समजत आले आहेत. हा लेखक विशिष्ट आत्मनिष्ठा बाळगून त्याशी सुरक्षित अंतर ठेवून वागत असतो हे मात्र सत्य. आत्मपर लिहिताना काही मर्यादाही पाळलेल्या दिसतात.

ललित लेखनाची उपशाखा मानल्या गेलेल्या प्रवासवर्णनात  चिंतनशीलतेला अधिक महत्त्व आहे. एकच प्रदेश दोघा चौघांनी पुन्हा पुन्हा पाहिला तरी तोच प्रदेश लेखकाने जर चिंतनशीलपणे टिपल्यास वेगळा भासू लागतो. प्रवासवर्णना मध्ये प्रवास करणाऱ्याला म्हणजे लेखकाला तो प्रदेश पाहून काय वाटले. त्याच्या काय प्रतिक्रिया झाल्या व तो ते कशा तऱ्हेने व्यक्त करतो ह्याला जास्त महत्त्व असते. त्यामुळेलेखकाच्या स्वभाव धर्मामुळे त्याच प्रदेशाचे प्रवासवर्णनही  एकमेकांपासून संपूर्णपणे वेगवेगळी  होऊ शकतात. लेखक जितका चिंतनशील, जितका संवेदनशील, सौंदर्याचा भोक्ता, कवी मनाचा, चतु:रस्त्र व बहुरंगी तितके त्यांचे प्रवासवर्णन रोचक बनते. म्हणजेच प्रत्येकाचे प्रवासवर्णन हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे निदर्शक होईल.

प्रवासवर्णनातून लेखक  जर  दिसला नाही तर ते ललित लेखन न होता प्रवाशी गाईड किंवा माहितीवजा टिपण ठरेल. याचाच अर्थ असा की ललित लेखन लिहिणे ही  मौजेची गोष्ट नसून त्यालाही चिंतनाची धार लागतेच. विषय कुठलाही असला तरी त्याचे प्रकटीकरण आणि त्याने वाचकांना किती अंतर्मूख केले यावरही त्याचे मूल्य अवलंब असते.

ललित साहित्याचे स्वरुप समाजवून घेताना उपरोक्त बाबींचा साकल्याने विचार करणे क्रमप्राप्त ठरते. उत्तरोत्तर ललित लेखनाचे स्वरुप आणखी वेगवेगळी  वळणे  घेताना दिसते. आजचे ललित लेखन हे म्हणूनच आठवणी अनुभव ह्यांच्या व्यक्तिप्रकृतीनुरुपच अनोखा आविष्कार घडविते. ते अधिक सर्वसमावेशक आणि सर्वस्पर्शी बनत  आहे. त्याच्या आत्मनिष्ठेमुळे त्यात व्यक्तिचित्रणे, प्रवासवर्णने , शब्दचित्रे, पत्र, आठवणी , आत्मवृत्तसदृश्य आत्मपर लेख, विनोदी लेखन इत्यादींचा समावेश केला जातो. काही समीक्षक लेखक त्यास गुजगाष्टी म्हणतात तर कुणी ललित निबंध, कुणी ललितबंध तर कुणी ललित गद्य असे त्यास संबोधतात. यातून निर्दिष्ठ होणारे सर्व स्फूट लेखन थोडयाफार फरकाने भिन्न असले तरी त्यात सर्वसाधरण मध्य दाखवणारी काही तत्त्वे आहेत.

आधुनिक मराठीत आजवर अशी विविधांगी अनुभवसंचिते जमा होत आली आहेत व ललितगद्याची व्यापक परंपरा सिध्द झालेली आहे. असे असले तरी लघुनिबंधाला निश्चित अशी लेखन सूत्रे मिळालेली दिसून येत नाहीत. प्रत्येक लेखकाचा वैशिष्टयपूर्ण आविष्कार मी च्या भाववृत्ती टिपत असलेला दिसतो. या परंपरेवर नजर टाकता यात स्त्रीलेखिकांनीही उल्लेखनीय दर्जेदार लिखान केल्याचे दिसून येत आहे.

एकूणच ललितगद्याच्या स्वरुपाचा आपणास असा अराखडा काढता येतो की, यात खेळकरपणा, कल्पकता, सामाजिकता, चिंतनशीलता, काव्यात्मता बहुश्रुतता, मार्मिक वि नोदपरता, सत्प्रवृत्ती बदद्लची आत्मियता इत्यादी विशेष दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर काळात लघुनिबंधाचे स्वरुप, हळू हळू ललितगद्याच्या व्यापक स्वरुपात समाविष्ट झालेले आहे. त्यास प्रवासवर्णन, लघुनिबंध, वैचारिक निंबध, ललितलेख, व्यक्तिचित्रे, आठवणी अनुभव इत्यादी सर्वाचा संकलित संकर झालेला दिसतो.  फडके-खांडेकरकालीन गुजगोष्टीला वेगळाच आकार आलेला दिसून येतो. सर्वच लेखकांनी आपल्या जीवनानुभव परिप्रेक्षातील नावीन्याची नेमकी अभिव्यक्ती करण्यासाठी हा वाङ्मय प्रकार हाताळलेला आहे.

**संदर्भ :-**


१) देशपांडे अ. ना. - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड-दुसरा, व्हिनस प्रकाशन -पुणे

२) कुलकर्णी अ. अ. - प्रदक्षिणा-खंड - २, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे - ३०

३) राजाध्यक्ष विजया - बहुपेडी विंदा, मौज प्रकाशन गृह, मुंबई - ०४

४) कुलकर्णी पंडीत अनंत - मराठी लघुनिबंधाचा जनक कोण?, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे - ३०